हिंदु जनजागृती समिती पुरस्कृत ग्रंथ !

ग्रंथमालिका ‘आदर्श राष्ट्ररचना’ : हिंदु राष्ट्र – खंड २

# हिंदु राष्ट्र : आक्षेप आणि खंडण

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले,**

**श्री. रमेश हनुमंत शिंदे** (प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती),

**आणि श्री. चेतन धनंजय राजहंस** (प्रवक्ते, सनातन संस्था)



## सनातन संस्था



卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐

मराठी ३४५, इंग्रजी २०१, कन्नड १९९, हिंदी १९७, गुजराती ७०, तेलुगु ५४, तमिळ ४४, बंगाली ३०, मल्ल्याळम् २५, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**फेब्रुवारी २०२५ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९९ लाख १० सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना (२२ मार्च १९९९)

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून १२.३.२०२५ पर्यंत १३१ साधक संत झाले, तर १,०५२ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल

३. देवता, साधना, राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती (वर्ष १९९५ पासून आरंभ)

४. हिंदुत्वनिष्ठ नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक (२८ एप्रिल १९९८ ते १९ एप्रिल २००० पर्यंत)

५. धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्वनिष्ठ आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन !

७. भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रसारार्थ ‘भारत गौरव पुरस्कार’ देऊन फ्रान्सच्या संसदेत सन्मान (५ जून २०२४)

(संपूर्ण परिचयासाठी वाचा – **www.Sanatan.org**)

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी !

सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ या सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत. ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’त उल्लेख केल्यानुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति’ या उपाधीने संबोधले जात आहे. F (DrUtt + SStAG-Nav + SStBS-Nav)

## श्री. रमेश शिंदे (राष्ट्रीय प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती)



‘सनातन धर्मभूषण’, ‘हिंदु कुलभूषण पुरस्कार’, ‘सांस्कृतिक योद्धा पुरस्कार’ आदी पुरस्कारांनी सन्मानित असून धर्मप्रसारक म्हणून देशभर प्रवास करतात. ‘बुद्धीप्रामाण्यवाद्यांचा अहंकार’, धर्मांतर, ‘हिंदु राष्ट्र’, ‘मनुस्मृति’, ‘लोकशाहीतील दुष्प्रवृत्ती’, ‘हलाल जिहाद’ आदी विषयांवरील सनातनच्या ग्रंथांचे संकलक आहेत.



## श्री. चेतन राजहंस (प्रवक्ते, सनातन संस्था)


‘सनातन धर्मवीर’ उपाधीने सन्मानित असून विविध दूरचित्रवाहिन्यांवर हिंदु धर्माची बाजू मांडतात. सनातनच्या ग्रंथांचे संकलन आणि हिंदूसंघटनार्थ प्रवास करतात. गोवा येथील ‘अखिल भारतीय हिंदु राष्ट्र अधिवेशना’च्या आयोजनात सक्रीय सहभाग असतो.

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाध्यांविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या नाडीपट्ट्यांमध्ये परात्पर गुरु डॉ. आठवले, सनातनचे संत आदींविषयीही उल्लेख आहेत. ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’त उल्लेख केल्याप्रमाणे १३.७.२०२२ पासून परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले, तरी त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी ‘प.पू.’ किंवा ‘परात्पर गुरु’ अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

## ग्रंथ वाचण्यास आरंभ करण्यापूर्वी पुढील प्रार्थना करा !

हे कुलदेवते (स्वतःच्या कुलदेवतेचे नाव घ्यावे) आणि हे श्रीराम, आपल्या कृपेने या ग्रंथातील विषय मला नीट समजू दे अन् त्यानुसार मला योग्य आचरणही करता येऊ दे !



# अनुक्रमणिका

**(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


१. हिंदु राष्ट्र : तात्त्विक विषयांशी संबंधित आक्षेप आणि खंडण ८

१ अ. 'हिंदु' शब्दाच्या उत्पत्तीच्या संदर्भातील आक्षेप आणि खंडण ८

१ आ. 'हिंदु' शब्दाच्या व्याख्येच्या संदर्भातील आक्षेप आणि खंडण १२

१ इ. 'राष्ट्र' शब्दाच्या संदर्भातील आक्षेप आणि खंडण १५

१ ई. 'हिंदु राष्ट्र' या संकल्पनेच्या संदर्भातील आक्षेप आणि खंडण २०

२. धर्माधारित राष्ट्ररचनेच्या संदर्भातील आक्षेप आणि खंडण २४

३. 'सेक्युलर' शब्दाविषयीचे आक्षेप आणि खंडण ३३

४. अल्पसंख्यांकांचे तुष्टीकरण आणि बहुसंख्यांक हिंदूंवर अन्याय करणारा भारतातील पक्षपाती 'सेक्युलर'वाद ! ४७

५. भारताचे संविधान, हिंदु धर्म आणि हिंदु राष्ट्राची अनिवार्यता ! ५१

६. हिंदु राष्ट्र आणि आदर्श राज्यव्यवस्था या दृष्टीकोनातून संविधानात करावयाच्या सुधारणा ५६

७. भारत 'हिंदु राष्ट्र' होण्याच्या संदर्भातील सामाजिक आक्षेप अन् खंडण ६२

८. भारत 'हिंदु राष्ट्र' होण्याच्या संदर्भातील आर्थिक आक्षेप अन् खंडण ७१

९. भारत 'हिंदु राष्ट्र' होण्याच्या संदर्भातील प्रशासकीय आक्षेप अन् खंडण ७६



## ऋणनिर्देश

या ग्रंथाच्या संकलनासाठी प्रा. रामेश्वर मिश्र (भोपाळ) यांच्या 'भारत का संविधान, भारत का धर्म' या ग्रंथाचा, तसेच डॉ. अरविंद गोडबोले (पुणे) यांच्या 'हिंदुत्व विचार : आक्षेप आणि वास्तव) या ग्रंथाचा पुष्कळ उपयोग झाला. यासाठी त्यांच्याप्रती कृतज्ञता.

# मनोगत

आजकाल ‘हिंदु राष्ट्र’ हा शब्द ‘सेक्युलर भारता’मध्ये आक्षेपार्ह समजला जात आहे. काही जणांचे तर ‘हिंदु’ या शब्दाच्या संदर्भातच मूलभूत आक्षेप आहेत. ‘हिंदु राष्ट्रा’ची कल्पना असंवैधानिक आहे’, असा ‘सेक्युलर’ विचारकांचा आक्षेप आहे. सामाजिक सौहार्दाच्या गप्पा मारणाऱ्यांना ‘हिंदु राष्ट्र संकुचित किंवा कट्टरपंथी’ वाटते. अहिंदू पंथियांना ‘स्वतःच्या प्रगतीमध्ये ‘हिंदु राष्ट्र’ अडसर ठरेल’, असे वाटते. हे आक्षेप प्रातिनिधिक असले, तरी असे अनेक आक्षेप ‘हिंदु राष्ट्र’ या शब्दाच्या अवतीभोवती असतात. या आक्षेपांची वास्तविकता काय आहे ? भारत स्वयंभू ‘हिंदु राष्ट्र’ आहे का ? आणि ‘हिंदु राष्ट्र-स्थापनेसाठी कार्य करणाऱ्यांचा मूलभूत विचार काय आहे’, या प्रश्नांची उत्तरे देणारा हा ग्रंथ आहे.

अनादी काळापासून ‘हिंदु राष्ट्र’ ही भारताची ओळख होती. इस्लामी आणि ब्रिटीश यांच्या राजवटीतही हिंदु राजांनी ही ओळख कायम ठेवली होती. वर्ष १९४७ मधील फाळणीनंतर संविधान सभेत भारताची ही ओळख पुसण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला. वर्ष १९७६ मध्ये मात्र इंदिरा गांधींनी असंवैधानिक पद्धतीने भारतीय संविधानात ‘सेक्युलर’ शब्द घालून भारताची ‘हिंदु राष्ट्र’ ही ओळख संपुष्टात आणली. आज अवघ्या ४२ वर्षांतच विदेशी ‘सेक्युलर’वाद मानाचा ठरला आहे आणि ‘हिंदु राष्ट्र’ मात्र हीन दर्जाचे ठरवले जात आहे. त्याही पुढे जाऊन सध्या ‘हिंदु राष्ट्र’ असा उच्चार करण्यालाच अवैध ठरवण्याचा दुष्ट प्रयत्न चालू आहे. ही स्थिती अशीच चालू राहिली, तर भविष्यात भारत ‘अहिंदू राष्ट्र’ होण्याचा धोका आहे. अशा वेळी ‘हिंदु राष्ट्र’ या विषयाच्या संदर्भात आक्षेपांचे खंडण करणे आवश्यक ठरते. म्हणूनच या ग्रंथाचे प्रयोजन आहे.

हा ग्रंथ वाचून हिंदू आणि अहिंदू यांच्या मनातील ‘हिंदु राष्ट्र’ या संकल्पनेविषयी असलेले आक्षेप दूर व्हावेत आणि तेही संवैधानिक दृष्टीकोनातून भारत ‘हिंदु राष्ट्र’ घोषित करण्याच्या कार्यात कृतीशील व्हावेत, ही जगद्गुरु भगवान श्रीकृष्णाच्या चरणी प्रार्थना ! – **संकलक**